महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर - ४१६ ००४
**Maharashtra** State Board of Secondary & Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Rajendranagar, Kolhapur - 416 004

Phones: Chairman 0231-2690829 Secretary 0231- 2691405 FAX : [0231] 2690758
PBX - 0231-2696101, 2696102, 2696103 E-Mail: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/लेखा/टंविफीमाफी/ 2195
कोल्हापूर - ४१६००४
दिनांक - 29 DEC 2021

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा सातारा, सांगली, कोल्हापूर

**विषय :-सन २०१७-१८,२०१८-१९ आणि २०१९-२० मधील टंचाईग्रस्त/दुष्काळग्रस्त आणि अवेळी पावसामुळे बाधित क्षेत्रातील विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना ऑनलाईन माहिती भरणेस मुदतवाढ देणेबाबत.**

**संदर्भ :- १)** राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं./अंदाजपत्रक/टंविफीमाफी/५०३२ दिनांक २५/०८/२०२१
२) या कार्यालयाचे क्र.कोविमं/लेखा/टंविफीमाफी/९५० दिनांक २७/०८/२०२१
३) राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं./अंदाजपत्रक/टंविफीमाफी/७१५६ दिनांक २२/१२/२०२१

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सन २०१७-१८, २०१८-१९ मधील इ.१० वी व इ.१२ वीच्या परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीस पात्र असलेल्या आणि अद्याप परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती न झालेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कप्रतिपूर्ती करणेसाठी तसेच सन २०१९-२० मधील अवेळी पावसामुळे ३४ जिल्हयातील ३४९ तालुक्यातील बाधित क्षेत्रातील पात्र विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीसाठी इ.१० वी साठी **Http:feerefund.mh-ssc.ac.in** आणि इ.१२ वी साठी **Http:feerefund.mh-hsc.ac.in** ह्या लिंक मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर (**mahahsscboard.in**) उपलब्ध करून ऑनलाईनद्वारे माहिती मागविणेस ३० सप्टेंबर, २०२१ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली होती.

तथापि राज्यातील कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव विचारात घेता सदर योजनेच्या ऑनलाईन कार्यप्रणालीस **दिनांक २८ फेब्रुवारी २०२२ पर्यंत राज्य मंडळ, पुणे यांचेकडून मुदतवाढ देण्यात येत आहे**. तसेच लाभार्थींची माहीती ऑनलाईन भरतेवळी आपणाकडून लाभार्थींचे अचूक आधार क्रमांक नमूद करून माहिती विहित मुदतीत भरण्यात यावी.

(सत्यवान सोनवणे)
**विभागीय सचिव,**
**म. रा. माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**

**प्रत माहितीस्तव :-** १) मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजी नगर, पुणे.
२)विभागीय शिक्षण उपसंचालक,कोल्हापूर
३)शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सातारा, सांगली,कोल्हापूर - यांना कळविण्यात येत की, तातडीने सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य यांचेशी समक्ष संपर्क साधून बाधित क्षेत्रातील पात्र विद्यार्थ्यांची अद्याप अप्राप्त असलेली माहिती ऑनलाईन पध्दतीने राज्यमंडळास विहीत कालावधीत उपलब्ध करून देण्याबाबत पाठपुरावा करावा. तसेच लाभार्थ्यांचा अचूक आधार क्रमांक नमूद करणेबाबत आपले स्तरावरून अवगत करावे.